Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# भारतातील लघु व कुटीर उद्योगाची खालावलेली अवस्था

राजेश प्रल्हाद कांबळे
अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर
*Corresponding Author :- kamblerp17@gmail.com

Communicated : 20.12.2022 Revision : 12.01.2023 Accepted : 20.01.2023 Published: 30.01.2023

**सारांश :**
औद्योगिकदृष्टया भारताचा भूतकाळ गौरवपूर्ण होता. जगातील इतर देश ज्या काळात संस्कृतीच्या प्रारंभिक अवस्थेत होते त्या काळात औद्योगीकदृष्टया भारत प्रगतीच्या शिखरावर पोहचलेला होता. ढाक्याची मलमल, मुराबादाची भांडी, काश्मीरचे गालीचे अशा अनेक कलात्मक वस्तूच्या निर्मीतीसाठी त्या वेळी भारताला जागतिक प्रसिध्दी मिळाली होती. परंतु १८ व्या शतकात ब्रिटीशांचे भारतात आगमन झाले. व त्यांच्या कुटील राजनीतीमुळे हळूहळू लघु व कुटीर हे व्यवसाय नष्ट होऊ लागले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने मात्र लघु व कुटीरउद्योगाचे देशाच्या अर्थव्यवस्थेतील महत्व लक्षात घेऊन लघु व कुटीर उद्योगाच्या विकासासाठी विविध प्रयत्न केले आहे. त्यामुळे आधुनिक काळात लघु व कुटीर उद्योग हे देशाच्या अर्थव्यवस्थेचे एक महत्वाचे अंग बनले आहे.
भारतीय अर्थव्यवस्थेत लघु व कुटीर उद्योगांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी व दादाभाई नौरोजी यांनी भारतातील दारीद्रय दूर करण्यासाठी लघु व कुटीर उद्योगावर भर दिला. लघु व कुटीर उद्योग हे श्रमप्रधान उद्योग असल्यामुळे कमी भांडवल गुंतवणुकीतून अधिक रोजगार उपलब्ध होतो. त्यामुळे भारतासारख्या विकसनशिल देशात लघु व कुटीर उद्योगाचा विकास महत्वाचा वाटतो. तसेच लघु व कुटीर उद्योग हे माठया उद्योगांना पूरक ठरतात. भारतात शेती व्यवसायानंतर लघु व कुटीर उद्योगावर बहुसंख्य भारतीयाचे जीवनमान अवलंबून असल्याचे दिसून येते. मोठया उद्योगाच्या तुलनेत लघु व कुटीर उद्योगांना भांडवल, श्रम, जागा, व तंत्रज्ञान हे कमी लागते. भारत सरकार व राज्यसरकारने लघु व कुटीर उद्योगाचे महत्व लक्षात घेवून सहकार्य, सवलती व प्रोत्साहनाचे धोरण स्वीकारले आहे. देशाच्या आर्थिक विकासात लघु व कुटीर उद्योगाची भूमीका ही फार महत्वाची आहे. त्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशात लघु व कुटीर उद्योग टिकून राहणे व विकसीत होणे फार गरजेचे आहे.

## प्रस्तावना :

### लघु उद्योग म्हणजे काय?

१) ज्या उद्योगात २० ते ५० श्रमिक काम करतात व त्यात गुंतविलेले भांडवल ५ लक्ष रू. पेक्षा कमी असते आणि जे कारागिराच्या घरी चालविले जात नाही त्याला लघु उद्योग असे म्हणतात. वित आयोग १९४९—५०

२) ज्या उद्योगाची सयंत्र व यंत्र सामुगी यांच्यामधील गुंतवणूक १ कोटी रूपयापर्यंत असते आणि सुटया भागाचे व यंत्र साहित्यांचे उत्पादन करणाऱ्या ज्या सहाय्यक अथवा पूरक उद्योगातील गुंतवणूक १ कोटी रूपयापर्यंत असते त्याला लघु उद्योग असे म्हणतात. भारत सरकार.

### लघु उद्योगाची वैशिष्टे :

१) ह्या उद्योगाची स्थापना शहरी किंवा अर्धशहरी भागात केली जाते.

२) ह्या उद्योगात बाहेरचे श्रमिक लावून उत्पादन केले जाते.

३) ह्या उद्योगात उत्पादनासाठी आधुनिक तंत्राचा व विजेचा वापर करण्यात येतो.

४) उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल बाहेरच्या बाजारपेठेतून खरेदी केला जातो.

५) तयार होणारा माल बाहेरच्या बाजारपेठेत विकला जातो.

६) लघु उद्योगाचे संचालन सहकारी संस्थाकडून केले जाते.

### कुटीर उद्योग म्हणजे काय ?

१) कुटूंबातील सदस्यांच्या मदतीने पूर्णकालीन किंवा अंशकालीन व्यवसाय चालविण्यात येणाऱ्या उद्योगाला कुटीर उद्योग असे म्हणतात. वित आयोग—१९४९.५०.

२) जे उद्योग श्रमिक स्वत:च्या घरात चालवितात व त्यामध्ये स्वत:च्या मालकीच्या अवजारांच्या सहाय्याने व स्वत:च्या कुटूंबातील सदस्यांच्या मदतीने उत्पादन करतात त्याला कुटीर उद्योग असे म्हणतात.

३) जा एखादा कारागीर आपल्या कुटूंबातील व्यक्तीच्या मदतीने एखादा प्रमुख किंवा सहाय्यक उद्योग, आपल्या घरी करीत असेल तर त्याला कुटीर उद्योग असे म्हणतात. वित आयोग.

९) भारतातील कुटीर उद्योग हे जातीव्यवस्थेशी संबंधित आहे.

१०) ग्रामीण भागातील लोकांना आवश्यक वस्तूचे उत्पादन केले जाते.

**भारतात लघु व कुटीर उद्योगाची भूमिका :**

भारताच्या औद्योगिक व ग्रामीण विकासात लघु व कुटीर उद्योगाचे बरेच महत्व आहे. देशाच्या आर्थिक सामाजिक समस्या सोडविण्यासाठी लघु व कुटीर उद्योग सहाय्यभूत ठरतील याबाबत अर्थशास्त्रज्ञामध्ये मतभेद आहेत. योजना आयोगाच्या मते, राहणीमानाचा दर्जा वाढविणे तसेच अधिक संतुलित व समन्वित अर्थव्यवस्था निर्माण करणे व रोजगारीच्या संधीत वाढ करणे ही ग्रामीण उद्योगाचा विकास करण्याची उद्देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत लघु व कुटीर उद्योगांची भूमिका किती महत्वाची आहे ते पुढील मुद्दांवरून स्पष्ट होते.

**१) शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यास मदत:–**

२०शतकात भारताची लोकसंख्या फार झपाटयान वाढली आहे. त्यामुळे शेतीवर आपली उपजिवीका करणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढले. शेतीवर असलेला हा अतिरीक्त लोकसंख्येचा भार कमी केल्याशिवाय शेतीत सुधारणेची कोणतीही योजना यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून लघु व कुटीर उद्योगाचा विकास केल्यास अनेक लोकांना रोजगार मीळेल व शेतीवरील लोकसंख्येचा अतिरिक्त भार कमी होईल.

**२) भांडवलाची कमतरता:–**

भारतात भांडवलाची मुळातच कमतरता आहे. लघु आणि कुटीर उद्योग हे मुख्यता श्रमप्रधान असतात त्यामुळे लघु व कुटीर उद्योगात मोठया प्रमाणात भांडवल गुंतविण्याची आवश्यकता नसते. भारतात मुळातच भांडवलाची कमतरता असल्यामुळे लघु व कुटीर उद्योगाचा विकास सोपे जाते

**३) विकेंद्रीकरणास मदत :**

लघु व कुटीर हे वेगवेगळया प्रदेशात स्थापन झालेले असतात. त्यामुळे त्याप्रदेशात उपलब्ध असणारी उत्पादनाची साधने, श्रम, कच्चा, माल ई. उपयोग करता येते. लघु उद्योगामुळे विकेंद्रीकरण होऊन वेगवेगळया प्रदेशात रोजगारांच्या संधी उपलब्ध होतात. म्हणून लघु व कुटीर उद्योगामुळे अर्थव्यवस्थेचे योग्य विकेंद्रीकरण होऊ शकते.

**४) नैतिक व सामाजिक दृष्टीने महत्वपूर्ण :**

लघु व कुटीर उद्योगात कारागीर हेच मालक असतात. त्यामुळे त्यांचे शोषण होऊ शकत नाही. लघु व कुटीर उद्योगात कारागीर स्व:तच मालक असल्यामुळे शोषणरहीत समाजाची निर्मीती होणे संभव असते. हे नैतिक व सामाजिक दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असते.

**५) आर्थिक स्थिरता निर्माण होते:**

शेती व्यवसायाची अनिश्चितता व दुष्काळाची संभावना यामुळे ग्रामीण भागात नेहमीच आर्थिक अस्थिरता निर्माण होते. लघु व कुटीर उद्योगाचा विकास करण्यात आल्यास लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन व कृषी व्यवहारातील अनिश्चितता व दुष्काळाची भीती दूर होऊन आर्थिक स्थिरता निर्माण होईल.

**६) सुरक्षितता :**

युध्द काळात मोठया उद्योगापेक्ष लघु व कुटीर उद्योग जास्त सुरक्षीत राहू शकतात. कारण मोठे उद्योग हे शहराच्या ठिकाणी केंद्रीभूत झालेली असतात. शत्रु राष्ट्रांकडून या शहरावर बॉम्ब वर्षाव झाला तर फार मोठे नुकसान होऊन देशाची सर्व अर्थव्यवस्था ही विस्कळीत होत असते. उलट लघु व कुटीर उद्योग हे देशाच्या ग्रामीण भागात

I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 224-229
A Double-Blind Peer Reviewed Journal

e-ISSN 2347 – 517X
Original Article

असल्यामुळे ही शक्यता कमी असते व लघु व कुटीर उद्योग हे सुरक्षीत राहतात.

**७) किंमत पातळी स्थिर ठेवण्यास उपयुक्त:**

भारताच्या लोकसंख्या वाढीबरोबर उपभोग्य वस्तुची मागणीसुध्दा वाढत आहे. त्यामुळे वस्तूच्या किंमत पातळी वाढत आहे. लघु व कुटीर उद्योगाचा विकास झाल्यास वस्तूचा पुरवठा वाढून किंमत पातळी नियंत्रित होऊ शकते.

**८) सुंदर व कलात्मक वस्तूचे उत्पादन:**

मोठया उद्योगात तयार होणाऱ्या वस्तू हया साचेबंद असतात. उत्पादनाच्या सर्व प्रक्रिया यंत्राच्या सहाय्याने पार पाडण्यात येत असल्यामुळे कामगाराच्या कौशल्याचा मोठया उद्योगात मुळीच वापर होत नाही. परंतु लघु व कुटीर उद्योगात कामगाराच्या कलेला व कौशल्याला भरपूर वाव असल्यामुळे कामगार लघु व कुटीर उद्योगात आपली संपूर्ण कला ओतून सुंदर व कलात्मक वस्तूचे उत्पादन करू शकतात.

**भारतातील लघु व कुटीर उद्योगाच्या ऱ्हासाची कारणे:**

भारतातील लघु व कुटीर उद्योगाचा इतिहास फार जुना आहे. आज औद्योगिक दृष्टया प्रगत समजले जाणारे इतर देश ज्यावेळी संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत होते त्यावेळी भारत लघु व कुटीर उद्योगात निर्माण होणाऱ्या कलात्मक वस्तूसाठी जगप्रसिध्द होता. तसेच ब्रिटीशांचे राज्य भारतावर येण्यापुर्वी भारताचे लघु व कुटीर उद्योग उर्जिताव्यवस्थेत होते. परंतु भारतामध्ये ब्रिटीश राजवटीच्या काळात लघु व कुटीर उद्योगाच्या ऱ्हासाला सुरवात झाली यांचे प्रमुख कारण ही पुढीलप्रमाणे आहे.

**१) औद्योगिक क्रांती :**

१७५० मधील युरोपातील औद्योगिक क्रांतीमुळे मोठया प्रमाणावर उत्पादन करण्यास सुरूवात झाली. मोठया प्रमाणावरील उत्पादनामुळे वस्तुंचा उत्पादन खर्च व यंत्रनिर्मित वस्तूंची किंमत पण कमी होती. औद्योगिक क्रांतीत नवीन यंत्रामुळे भारतातील लघु व कुटीर उद्योग टिकाव धरू शकले नाही.

**२) राजे, नबाब व जहागीरांचा शेवट :**

ब्रिटीशांची राजवट येण्यापूर्वी भारतात अनेक लहान मोठे राजे, नवाब व जहांगीरदार होते. त्याच्या कडे भरपूर पैसा असल्यामुळे ते विविध कलात्मक वस्तूंची खरेदी करत असत. तसेच राजे, नवाब व जहांगीरदार हे लोक कलात्मक वस्तुंचे शौकिन असल्यामुळे ते कारागीरांना आश्रय देत असत. व त्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करीत असत. परंतु ब्रिटीशांच्या आगमनानंतर राजे, नवाब व जहांगीरदारी नष्ट झाली. अशाप्रकारे लघु व कुटीर उद्योगाच्या अध:पतनाला सुरूवात झाली.

**३) इस्ट इंडिया कंपनीचे प्रतिकूल धोरण :**

सुरूवातीच्या काळात इस्ट इंडिया कंपनीने भारतातील कुटीर उद्योगामध्ये होणाऱ्या वस्तूची इंग्लंडमध्ये निर्यात केली. परंतु त्यामुळे तेथील कारागीर व कारखानदारांच्या हितसंबंधाना जबर धक्का बसला. म्हणून तेथील कारखानदारांनी कंपनीवर दडपण आणून निर्यात कार्य बंद केले. अशाप्रकारे निर्यातीचे धोरण बदलवील्यामुळे भारतातील लघु व कुटीर उद्योगांना विदेशामधील बाजारपेठ गमवावी लागली.

**४) इंग्रजी शिक्षण व संस्कृतीचा परिणाम:**

ब्रिटीशांनी भारतात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार केला. राज्यकारभार सुरळीतपणे चालविण्यासाठी इंग्रजी जाणणारे कारकून उपलब्ध व्हावेत हा त्यामागचा उद्देश होता. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीय लोकावर विदेशी संस्कृतीचा परिणाम झाला. त्यामुळे त्यांनी देशी वस्तूंचा वापर बंद करून विदेशी वस्तूंचा वापर करणे सुरू केले. विदेशी वस्तूंचा वापर करणे ही एक फॅशन बनल्यामुळे लघु व कुटीर उद्योगातील उत्पादित होणाऱ्या वस्तूंची मागणी कमी झाली.

**५) सरकारचे धोरण:**

इंग्लंडमधील उद्योगपतीच्या हिताला प्राधान्य देण्यात आले. हयाकरीता लघु व कुटीर उद्योगातील कुशल कारागिरांचा विविध प्रकारे छळ करून त्यांचे उत्पादन बंद पाडण्याचे धोरण भारत सरकारने अंगीकारले. हया धोरणाचा लघु व कुटीर उद्योगावर खूप विपरीत परिणाम झाला.

**६) वाहतूक व्यवस्थेचा विकास :**

वाहतूक साधनाचा मोठया प्रमाणात विकास होऊ लागल्यामुळे इंग्लंडमधून आयात होणाऱ्या वस्तू भारताच्या सर्व बाजारपेठांमध्ये कमी किंमतीत उपलब्ध झाल्या. त्यामुळे लघु व कुटीर उद्योगाची अवनती झाली.

**भारतातील लघु व कुटीर उद्योगाच्या समस्या :**

अर्थव्यवस्थेत लघु व कुटीर उद्योगाचे किती महत्वपूर्ण स्थान आहे. हया उद्योगाच्या विकासाकरिता सरकारी पातळीवर बरेच प्रयत्न करण्यात आले. परंतु हया उद्योगाचा विकास करण्यास सरकारला अपेक्षित यश आले नाही. याचे मुख्य कारण हया उद्योगासमोर असलेल्या विविध समस्या होय. हया समस्या खालीलप्रमाणे आहेत.

**१) भांडवलाची समस्या:**

अवजारे, यंत्रसामुग्री व कच्चा माल खरेदी करण्याकरीता लघु व कुटीर उद्योगाला दिर्घकालीन भांडवलाची आवश्यकता असते. परंतु एवढे भांडवल गरीब कारागीराजवळ नसते. त्यामुळे त्यांना व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. व आपला माल नाईलाजाने कमी किंमतीत विकावा लागतो. अशाप्रकारे भांडवलाअभावी होणारी पिळवणूक ही उद्योगासमोरील एक मुख्य समस्या आहे.

**२) कच्चा मालाची समस्या :**

कुटीर उद्योगातील मालाचा दर्जा हा कारागीराच्या कौशल्यावर व कच्चा मालाच्या उत्कृष्टपणावर अवलंबून असतो. परंतू चांगल्या प्रकारच्या कच्चा माल पुरेशा प्रमाणात, योग्य वेळी व योग्य किंमतीला मिळत नसल्यामुळे त्यांना बेकार रहावे लागत.

**३) उत्पादनाचे जुनाट तंत्र :**

लघु व कुटीर उद्योगात आजही जुन्या व परंपरागत उत्पादन तंत्राचा वापर करण्यात येतो. त्यामुळे उत्पादन खर्च वाढून वस्तूचा दर्जा खालावते. त्यामुळे हे उद्योग मोठया उद्योगाच्या स्पर्धेत टिकू शकत नाही.

**४) विक्रीची समस्या:**

लघु व कुटीर उद्योगात जुन्या उत्पादन पध्दतीचा अवलंब केला जात असल्यामुळे उत्पादित वस्तू हलक्या दर्जाच्या व जास्त खर्चाच्या असतात. त्यामुळे ते स्पर्धेत टिकाव धरू शकत नाही. तसेच जाहिरातीचा अभाव, विक्रय संघटनेचा अभाव आणि विपणनविषयक माहितीचा अभाव यामुळे विक्रीची समस्या ही एक जटील समस्या झाली आहे.

**५) कराची समस्या:**

लघु व कुटीर उद्योगातील वस्तूचा उत्पादन व्यय जास्त असतो. तसेच राज्य व केंद्र सरकार या उत्पादनावर विविध प्रकारचे कर लावत असल्यामुळे उत्पादनाच्या किंमती वाढतात. व त्यामुळे हे उद्योग स्पर्धेत टिकू शकत नाही.

६) कारागिरांचा अशिक्षितपण व प्रशिक्षणाचा अभाव:

लघु व कुटीर उद्योगामध्ये काम करणारे कारागीर हे अशिक्षित असल्यामुळे त्यांना बाजारपेठेचे सखोल ज्ञान नसते. त्यामुळे वस्तुची मागणी कुठे आहे, आवडी–निवडीचे स्वरूप कोणते आहे हे त्यांना समजू शकत नाही. तसेच हे कारागीर अशिक्षित असल्यामुळे त्यांना प्रशिक्षण देण्यात अनेक अडचणी येतात.

**लघु व कुटीर उद्योगाच्या विकासाकरीता सरकारी प्रयत्न किंवा उपाययोजना:**

**१) निगम व विविध मंडळाची स्थापना :**

देशात लघु व कुटीर उद्योगांचा पध्दतशीर विकास घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारने अखिल भारतीय स्तरावर

विविध संस्थांनी स्थापन केली आहे. त्यातील प्रमुख संस्था पुढीलप्रमाणे आहे.

अ) अखिल भारतीय हस्तोद्योग मंडळ

ब) अखिल भारतीय हातमाग मंडळ

क) खादी व ग्रामोद्योग कमिशन

ड) लघु उद्योग मंडळ

ई) काथ्या मंडळ

फ) राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ

**२) आर्थिक मदत :**

लघु व कुटीर उद्योगापुढील भांडवलाची समस्या सोडविण्यासाठी पुढील व्यवस्था केली आहे.

अ) राज्य सरकारकडून:

कमी व्याजाच्या दरात कर्जपुरवठा केला जातो.

ब) राज्य वित निमग:

लघु व कुटीर उद्योगांना ही दीर्घकालीन कर्ज देत असते.

क) राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ :

ही संस्था लघु व कुटीर उद्योगांना यंत्रसामुग्री उपलब्ध करून देते.

ड) स्टेट बॅंक :

स्टेट बॅंक लघु व कुटीर उद्योगांना कमी व्याजाच्या दरावर व सुलभ अटीवर कर्ज पुरवठा करते.

**३) तांत्रिक मदत :**

भारत सररकारने लघु व कुटीर उद्योगांना तांत्रिक मदत करण्याच्या दृष्टीने औद्योगीक विकास सेवा योजना कार्यान्वीत केली आहे. या योजनेच्या माध्यमातून भारतीय विशेषज्ञांना उच्च शिक्षणासाठी व प्रशिक्षणासाठी विदेशात पाठविण्याची व्यवस्था केली आहे.

**४) विपणनाची मदत :**

राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ लघु उद्योगातील वस्तुंना आदेश मिळवून देण्याचे महत्वपूर्ण कार्य करीत आहे. तसेच हे महामंडळ वस्तूंच्या जाहीराती देवून मालाची विक्री वाढविण्याकरीता या मंडळाव्दारे प्रदर्शने भरवित असतात.

**५) प्रशिक्षणाची सोय :**

लघु व कुटीर उद्योगात काम करणाऱ्या कारागीरांना प्रशिक्षण देण्यासाठी सरकारने अनेक प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या आहेत. त्यात कारागीरांना उत्पादनाचे नवीन तंत्र व पध्दतीचे ज्ञान दिले जाते.

**६) करात सूट :**

राज्य व केंद्र सरकार लघु व कुटीर उद्योगातील उत्पादीत मालाच्या विक्रीवर कर आकारीत नाही. त्यामुळे विक्री वाढविण्यात बरीच मदत होते. तसेच मोठया उद्योगातील काही उत्पादनावर उपकर लावून त्यातून प्राप्त होणारे उत्पन्न लघु उद्योगांना मदत करण्यासाठी उपयोगात आणले जाते.

**७) निर्यातीत मदत :**

लघु व कुटीर उद्योगामध्ये उत्पादीत झालेल्या निर्यातीत वाढ करण्यासाठी भारत सरकारने विविध मंडळे स्थापन करून लघु व कुटीर उद्योगांना मदत केली आहे. आजही लघु व कुटीर उद्योगाच्या वाढीकरीता लघु उद्योग विकास महामंडळ, लघु उद्योग सेवा संस्था, निर्माण प्रोत्साहन मंडळ व राज्य व्यापार मंडळ लघु व कुटीर उद्योगांच्या निर्यात वाढीसाठी मदत करीत आहे.

**संशोधन अभ्यास विषयाची गरज :**

भारत सरकारने देशात ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी व ग्रामीण भागातील ग्रामीण बेकारी दूर करण्यासाठी भारत स्वतंत्र झाल्यापासूनच लघु व कुटीर उद्योगावर भर देण्यात आला. तसेच लघु व कुटीर उद्योगाचा उद्योग क्षेत्रावर मोठया प्रमाणावर प्रभाव पडला असून ग्रामीण उद्योग त्यास अपवाद मानता येणार नाही. कोणत्याही देशातील लघु व कुटीर उद्योगाचा विकास हा त्या देशातील औद्योगीक धोरणाच्या पातळीवर अवलंबून असते. त्यामुळे देशातील लघु व कुटीर उद्योगाचे देशाच्या अर्थव्यवस्थेत, औद्योगीक

विकासात महत्वाचे स्थान असल्यामुळे लघु व कुटीर उद्योगाचा अभ्यास होणे महत्वाचे वाटते.

आज संपूर्ण जगात कोरोनाच्या लाटेमुळे जगाचया अर्थव्यवस्था हया खालावलेल्या आहे. भारतात सुध्दा कोरोनाच्या लाटेमुळे देशातील अर्थव्यवस्थेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊन देशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मीक, राजकिय आव्हाने भारतीय समाजासमोर निर्माण झाली आहे. तसेच लघु व कुटीर उद्योग हा ग्रामीण विकासाचा कणा असून कोरोनाच्या लाटेमुळे लघु व कुटीर उद्योगाची स्थिती ही आजच्या परिस्थितीत खालावलेली आहे. त्यामुळे सुध्दा हया विषयांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय अर्थव्यवस्थेत लघु व कुटीर उद्योगांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी व दादाभाई नौरोजी यांनी भारतातील दारीद्रय दूर करण्यासाठी लघु व कुटीर उद्योगावर भर दिला. लघु व कुटीर उद्योग हे श्रमप्रधान उद्योग असल्यामुळे कमी भांडवल गुंतवणुकीतून अधिक रोजगार उपलब्ध होतो. त्यामुळे भारतासारख्या विकसनशिल देशात लघु व कुटीर उद्योगाचा विकास महत्वाचा वाटतो. तसेच लघु व कुटीर उद्योग हे माठया उद्योगांना पूरक ठरतात.

**संदर्भ :**

डॉ. सुधाकर शास्त्री भारतीय अर्थव्यवस्था विश्व पब्लिशर्स अंड डीस्ट्रीब्युटर्स, नागपूर. १९९९

प्रा. सु. पा. देव पिंपळापूरे अंड कंपनी पब्लिशर्स,

प्रा. ना. झामरे नागपूर, १९९१

डॉ. प्रकाश सोमलकर मेसर्स, रजनी प्रकाशन,

प्रो. राजेश डोंगरे नागपूर २०१९ जुलै